जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २६६ दिनांक - १७/०४/२०२५**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पिस्तुलाचा धाक दाखवुन विनयभंग तसेच ॲट्रोसिटी गुन्ह्यात पाहिजे आरोपीस केले जेरबंद

दि.२४/०३/२०२५ रोजी पिडीत फिर्यादी घरी जात असताना दिपक शिवाजी ठाकर याने त्याचेकडे असलेल्या पिस्तुलाचा धाक दाखवुन फिर्यादी यांचा विनयभंग केल्याने दिपक ठाकर याचे विरुध्द सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.११८/२०२५ भा.न्या.संहिता ७४,७८,३५१(२), अनुसूचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक सुधारणा अधिनियम २०१५ चे कलम ३(१)(w)(i) (ii),३(२)(va) आर्म ॲक्ट कलम ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा दाखल झाले पासुन पाहिजे आरोपी दिपक ठाकर हा भारतात वेगवेगळया ठिकाणी राहुन स्वतःचे अस्तीत्व लपवत होता.

दि.१४/०४/२०२५ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे दाखल गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार अमोल पवार व महेश मंडलिक यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे दिपक ठाकर हा उज्जैन, मध्यप्रदेश या ठिकाणी वास्तव्यास आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी सहकारनगर पोलीस स्टेशन कडिल वरिष्ठ पालीस निरीक्षक राहुल गौड यांना कळविली असता त्यांनी मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, राहुल आवारे यांना कळवुन लागलीच तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक सागर पाटील, व स्टाप यांची टीम तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करून उज्जैन, मध्य प्रदेश या ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे आदेश दिले त्यानुसार सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी उज्जैन, मध्यप्रदेश या ठिकाणी जावुन आरोपी राहत असलेल्या लॉजची माहिती मिळवुन त्याठिकाणी वेषांतर करुन शिताफीने आरोपीस ताब्यात घेऊन त्यास नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **दिपक शिवाजी ठाकर, वय ४५ वर्ष, रा. चव्हाणनगर धनकवडी पुणे** असे सांगितले असुन त्याच्याकडे सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं ११८/२०२५, या दाखल गुन्हयाच्या

अनुशंगाने विश्वासात घेवुन चौकशी करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात खाराकुंवा पोलीस स्टेशन,उज्जैन,मध्यप्रदेश येथे अटक करुन उज्जैन येथील मा.न्यायालयात हजर करुन ट्रांझिस्ट रिमांड घेऊन मा. विशेष सत्र न्यायालय, पुणे येथे हजर करण्यात आले असुन पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभागाचे श्री.राहुल आवारे हे करीत आहेत.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग श्री.राहुल आवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल गौड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती सुरेखा चव्हाण सहकारनगर पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक सागर पाटील,सहा.पोउपनिरी बापु खुटवड,पोलीस अंमलदार अमोल पवार, महेश मंडलिक, चंद्रकांत जाधव, प्रदिप रेणुसे, सागर सुतकर, बजरंग पवार, किरण कांबळे, अमित पदमाळे, योगेश ढोले, महेश भगत, आकाश किर्तीकर, खंडु शिंदे यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
फोन : ०२०-२४२२८११३ / २४२२६६०४
सहकारनगर पोलिस ठाणे
पुणे शहर

